# करभार



सन १९३४
स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 330
REFBK-0005138
REFBK-0005138

५५१०
ग्रंथ संग्रहालय
काव्य ११६५

# करभार

[ बडोद्यांतील कवींचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह ]

संपादक

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

२५ डिसेंबर १९३४

मुद्रकः—
श्रीनिवास केशव चित्रे बी. ए., एस्. टी. सी. डी.
आत्माराम मुद्रणालय
खारीबाव रोड
रावपुरा
बडोदें.

प्रकाशकः—
पुरुषोत्तम आत्माराम चित्रे
चित्रे यांचा वाडा
बडोदें.

एकोणिसाव्या

मराठी-साहित्य-संमेलनासाठीं

जमलेल्या

साहित्यभक्तांस—

REFBK-0005138

REFBK-0005138

बडोदें,
२५ डिसेंबर १९३४ } पु. आ. चित्रे.

# संपादकीय निवेदन

१. 'टला ट रीला री' करून काव्य प्रसवणाऱ्या कवींची पैदास आणि अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणें त्यांची समाजांत उतरलेली किंमत अशा काव्यग्रंथाच्या प्रसिद्धीला सर्वथैव निराशाजनक परिस्थितींत प्रस्तुत काव्यसंग्रहाच्या प्रसिद्धीला मी उद्युक्त कां झालों हें सांगणें आवश्यक आहे.

या वर्षी एकोणिसावें मराठी-साहित्य-संमेलन येथें भरण्याचा सुयोग आम्हां बडोदेंकरांना प्राप्त झाला आहे. त्या प्रसंगीं बडोद्याच्या कवींच्या काव्यांचा एक प्रातिनिधिक संग्रह करून तो महाराष्ट्र-शारदेच्या या दरबारांत बडोदर-वासियांचा 'करभार' म्हणून अर्पण करावा अशी औचित्यपर पण धाडसाची कल्पना माझ्या मनांत आली.

वयाचीं वीस वर्षेंही पुरीं झालीं नाहींत तोंच साहित्याच्या अफाट क्षेत्रांत अशा रीतीनें प्रवेश करायची कल्पना धिटाईचीच म्हटली पाहिजे. शिवाय 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिङ्गं न च वयः।' या वचनाचा आधार घ्यायला जावें तों पहिल्या शब्दालाच ठोकर बसायची! कारण मी प्रथितयश कविही नाहीं कीं सुप्र-

सिद्ध काव्यटीकाकारही नाहीं. असें असूनहि मी जें हें धाडस करित आहे त्याचें कारण माझ्याहून अधिक कार्यक्षम अशी कुणीतरी अधिकारी व्यक्ति हें कार्य करायला पुढें येईल ही माझी पुष्कळ वाट पाहूनही फोल ठरलेली आशाच होय.

२. 'करभार' हा बडोद्यांतील विद्यमान कवींच्या काव्याचा प्रातिनिधिक संग्रह व्हावा हा मुख्य कटाक्ष राखूनहि तो उच्च दर्जाच्या कवितांचाही संग्रह होण्याची दृष्टी ठेवणें अगत्याचें होतें. पण या दोन गोष्टींचा समन्वय करणें कित्येक वेळां इतकें बिकट झालें कीं संपादकाची स्थिती इंदु व बिंदू या दोघींनाही प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या महेश्वरासारखी झाली. आणि यामुळेंच कांहीं कविता उत्कृष्ट दर्जाच्या नाहींत हें दिसत असूनही संग्रहाच्या प्रातिनिधिकत्वाला बाध न येण्यासाठीं त्यांना 'करभारां'त स्थान दिलें आहे.

याशिवायही या संग्रहाच्या संपादकाच्या कार्याच्या मर्यादा ध्यानांत घेतां त्यांतील कवितांच्या दर्जाबद्दल तो व्यक्तिशः फारच अल्पप्रमाणांत जबाबदार आहे असें

आढळून येईल. आधीं संग्रहाच्या मूळ कल्पनेनेंच त्याचें क्षेत्र बडोद्यापुरतें संकुचित झालें होतें. त्यांत पुन: केवळ विद्यमान व आज बडोद्यांत असलेल्या कवींपुरतेंच तें मर्यादित करणें योग्य वाटलें. यामुळें एकीकडे दत्त, देवासकर इत्यादि दिवंगत कवींच्या कवितांस तर दुसरीकडे ठोकळांसारख्या आज बडोद्यास नसलेल्या कवींच्या कवितांस ' करभारा ' ला मुकावें लागलें. याशिवाय संपादकांचें क्षेत्र अधिकच लहान होण्याचें कारण ह्मणजे कवींनीं स्वत: निवडून पाठविलेल्या कवितांमधूनच त्यानें संग्रहाकरितां निवड करायची ! असो.

३. कुणाही वाचकाला या संग्रहाच्या वाचनानें बडोद्याची आजची कविता कशी आहे याची तर कल्पना येण्यास मदत होईलच पण शिवाय पुन: पुन: आवडीनें वाचाव्यात अशा हृदयंगम कविताही रसिकांना या संग्रहांत आढळतील. त्यांतल्या त्यांत चंद्रशेखरांच्या 'प्रतिभे !' व ' गृहिणीचे डोळे, ' भालचंद्र दत्तांची ' एक प्रार्थना, ' सौ० अपर्णा देशपांडे यांची ' तान्हुलीस पाहून, ' शेखरांची ' मुसलमान नटीस, ' इन्दुसखीची ' येशील ?, ' टोळे यांची ' करभार ' इत्यादि कविता त्यांतल्या भावना,

कल्पना, रचना, नादमाधुर्य अशा ह्या ना त्या गुणामुळें रसिकांना आवडतील अशी आशा आहे.

४. कवितांचा अनुक्रम कवींच्या जन्मसालाप्रमाणें लावण्याची कल्पना संग्रह प्रातिनिधिक करण्याच्या कल्पनेंतूनच निघाली. त्यामुळें वाचनाच्या ओघातच वाचकाला विद्यमान ज्येष्ठ कवींच्या कवितेपासून तों एका बालकवीच्या कवितेपर्यंत बडोद्याच्या कवितेचें आजतागायत स्वरूप सहज दिसून येईल. या अनुक्रमपद्धतीला एकच अपवाद करणें इष्ट वाटलें. या संग्रहांतील वयश्रेष्ठ कवि नंदुरबारकर यांची कविता या अनुक्रमानें पहिली म्हणजे चंद्रशेखरांच्या आधीं यावयास हवी. पण चंद्रशेखरांची ' प्रतिभे ! ' ही कविता प्रथम छापण्याचें औचित्य व संग्रहाच्या शिरोभागीं विराजमान होण्याची चंद्रशेखरांची योग्यता यांचा विचार करून जन्मसालांतील क्षुल्लक कालांतराला गौण स्थान दिलें आहे. या अपवादाच्या समर्थनीयतेबद्दल स्वतः नंदुरबारकरांचेंहि दुमत होणार नाहीं असें वाटतें.

५. निवड केलेल्या कविता जशाच्या तशा छापण्याचें धोरणच सामान्यतः स्वीकारलें आहे. क्वचित् एखाददुसऱ्या शब्दाचा फरक केला असेल नसेल एवढेंच.

६. ' करभारा ' च्या प्रसिद्धीची कल्पना व कवींना त्या प्रमाणें त्याला हातभार लावण्याची जाहिर विनंती मी स्थानिक वर्तमानपत्रांतून केली होती. तरीही ती वाचनांत न आल्यामुळें अगर येऊनही तिला मान न दिल्यामुळें ज्यांच्या कविता या संग्रहांत येऊं शकल्या नाहींत असे कांहीं कवी राहिले नसतील असें ह्मणतां येणार नाहीं. पण त्याला अर्थातच माझा उपाय नव्हता.

तरी ज्या ज्या कवींनीं माझ्या विनंतीस मान देऊन ही सर्वस्वी त्यांच्या सहकार्यावरच आधारलेली ' करभारा ' ची कल्पना फलीभूत होण्यास सहाय्य केलें त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

त्याचप्रमाणें केवळ निःपक्षपाती दृष्टीनेंच निवड करण्यांत ज्या कवींच्या सर्वच वा कांहीं कविता मी स्वीकारल्या नाहींत त्यांची मी क्षमा मागतो. अशा कवींत केवळ अपरिचितच नव्हेत तर माझे परिचित स्नेहीही आहेत. त्यांनीं माझें व्यक्तित्व व संपादकाची भूमिका यांचें भिन्नत्व ध्यानींत घ्यावें एवढेंच मी त्यांस नम्रपणें सुचवितों.

७. ' करभारा ' च्या या तबकावरील बहुमोल वस्त्र ज्या स्नेह्यांनीं तयार केलें आहे त्यांच्या नांवाचा उल्लेख तर

मला करतां येत नाहींच पण त्यांच्या बाबतींत आभाराच्या शिष्टाचाराची कल्पनाही अवघड वाटते.

८. शेवटीं, महाराष्ट्र–शारदेच्या या दरबारांत तिला अर्पण करण्यासाठीं बडोदरवासियांनीं आणलेल्या या ' करभारा ' कडे तिच्या दरबारांतील थोर माण्डलिक तो बडोद्यासारख्या एका दूरस्थ छोट्या सामन्ताकडून आलेला आहे या दृष्टीनेंच पहातील अशी आशा प्रदर्शित करून हें निवेदन येथेंच पुरें करतो.

बडोदें, पु. बा. चित्रे

ता. २१–१२–३४

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | | १ |
| २ | प्रतिभे ! | २ |
| ३ | गृहिणीचे डोळे | ४ |
| ४ | दृढ विश्वास | ८ |
| ५ | बालविधवा ! | ११ |
| ६ | उदारा, फेडुं कसें मी ऋण ? | १५ |
| ७ | हृदयंगम संगम | १९ |
| ८ | एक प्रार्थना | २३ |
| ९ | प्रीतीस | २६ |
| १० | एका मुलीस | २७ |
| ११ | गानसुधा | २९ |
| १२ | भावगीत | ३१ |
| १३ | मानलेल्या बहिणीस | ३६ |
| १४ | शेत्याची शीळ | ४० |
| १५ | खेड्यांतील हिरकणी | ४४ |
| १६ | एक आस | ४६ |
| १७ | विनयवती प्रियेस | ४८ |
| १८ | तान्हुलीस पाहून | ५१ |

१९ कन्दुका ! ५३
२० युवक ५४
२१ सृष्टिप्रेम ५५
२२ मुसल्मान नटीस ५८
२३ देव नसलेलें देऊळ ६२
२४ येशील ! ६५
२५ अभागी बहिण ६८
२६ जलबिंदूचें गाणें ७०
२७ जग आणि तूं ७२
२८ इच्छा ७३
२९ तारुण्य ७४
३० रानांतील उशीर ७५
३१ करभार ७७
टीपा

# 'करभारा' चे कवी

| | |
|---|---|
| १ राजकवि चंद्रशेखर | जन्म सन १८७१ |
| २ पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर | जन्म सन १८७० |
| ३ सुंदरनाथ गोविंद काळेले | जन्म सन १८९९ |
| ४ वनमाला जी.ए. | जन्म सन १९०० |
| ५ भालचंद्र दत्त एम्.ए. | जन्म सन १९०३ |
| ६ रामचंद्र म्हाळसाकान्त वाघमारे बी.ए.(ऑनर्स) | जन्म सन १९०८ |
| ७ नारायण बापुराव पुराणिक बी.ए. (ऑनर्स) | जन्म सन १९०८ |
| ८ गाङ्गेय | जन्म सन १९०८ |
| ९ सुरेश | जन्म सन १९०८ |
| १० भालचंद्र सिताराम डोंगरे बी.ए. | जन्म सन १९०९ |
| ११ कु. मालती रणदिवे जी.ए. | जन्म सन १९१० |
| १२ सौ. अपर्णा देशपाण्डे जी.ए. | जन्म सन १९११ |
| १३ शेखर | जन्म सन १९१२ |
| १४ यशवन्तानुज | जन्म सन १९१२ |
| १५ इन्दुसखी | जन्म सन १९१३ |
| १६ सारङ्ग | जन्म सन १९१४ |
| १७ पुरुषोत्तम आत्माराम चित्रे | जन्म सन १९१४ |
| १८ कुमार वसन्त | जन्म सन १९१५ |
| १९ रामचंद्र केशव रणदिवे | जन्म सन १९१६ |
| २० पद्मनाभ माधव टोळे | जन्म सन १९१७ |

करभार

चरणांशीं आज । तुझ्या होई रास
खेळे आकाशास । शिवाशीव

दिव्य तेज तीचें । नेत्र दीपवीतें
जणुं हीं खपुष्पें । खुडियेलीं

असा हा संभार ।—असा ' करभार '
पाहुनी विरोध । हंसूं नको

गारगोटि घेई । हिरकाचें तेज
तुझा हा प्रभाव । ऐकियेला

तोच दिव्य स्पर्श । देऊनियां यास
जन्माचें सार्थक । होऊं द्यावें

गारगोटि हीच । शोभेल तरीच
हिरकाचें तेज । लेवूनियां !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ५९३८

# प्रतिभे !

" A poet is born and not made."

[ रागिणी असावरी;— " जाई परतोनी " इ० ]

कुठुनि सखे ! वद येसी । प्रतिभे ! ॥ धृ० ॥
अज्ञेयाच्या अंध तमांतुनि ?
कीं तेजोमय खं–ब्रह्मांतुनि ?
चैतन्याच्या कीं हृदयांतुनि
संभवुनि स्फुरतेसी ? । प्रतिभे ! ॥ १ ॥

आणुनि उदया प्रेमसुधाकर,
हेलावुनियां रसरत्नाकर,
भावमयी ती पेरुनि साखर,
झुलविसि तूं दुनियेसी । प्रतिभे ! ॥ २ ॥

तूं जादूची अद्‌भुत करणी ?
कीं सोन्याची मोहक हरणी ?

किति हरले गे तुझिया हरणीं !
तरि झटतीं मृगयेसीं । प्रतिभे ! ॥ ३ ॥

साहित्याते घोंटुनि पंडित,
मंथुनि वाङ्मय गुरु गुणमंडित,
बनति कलानिधि शिकुनि अखंडित;
शिकुनि न तूं मिळतेसी । प्रतिभे ! ॥ ४ ॥

सोनारानें घडुनि गुलाबा,
खऱ्याखुऱ्यांची केली शोभा !
रसिक पुसे ना तरिहि तुला बा !
गंध न ये नकलेसी । प्रतिभे ! ॥ ५ ॥

काव्यकलेच्या निघतिल शाला,
दिसते कविता त्यांत कशाला !
लावुनि टेंभे आणे मशाला,
शोधुनि आण तियेसी । प्रतिभे ! ॥ ६ ॥

राजकवि चंद्रशेखर

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ........
ठाणे

## गृहिणीचे डोळे

[ चाल— ' उघडिं नयन रम्य उषा० ' ]

मधुर मधुर हेच झरे प्रेम–जीवनाचे !
बघुनि यांस हर्षभरें रसिक जीव नाचे ॥ धृ० ॥

पुष्करिणी ? कीं हरिणी ?
गुरुशुक्रान्वित रजनी ?
नृत्य असें नित्य मनीं
होय कल्पनांचें. १

श्रीयुत मुखकमल कसें
खुलुनि हंसे गुलगुलसें !
यावरि हे झुलति जसे
भृंग मधुवनाचे. २

हे विनयें खालवले,
अमृतभरें वा लवले,

बघुनि यांस आठवले
पुंज नव घनांचे. ३

अन्नजलीं रुचि भरिती,
संतर्पण आचरिती,
गृहमेधांतुनि करिती,
साह्य इंधनाचें. ४

परवशता भरुनि उरे.
छळिति दैत्य. हाल बुरे !
तरि कारागृहचि बरें
नयनबंधनाचें. ५

यांचे मृदु विभ्रम ते
किति सुललित ! मन रमतें !
हेंच मला सुख गमतें
नंदना वनाचें ६

झगझगतें तेज कसें !
दिव्य जवाहीर असे !



मराठी ग्रंथ संग्रहा
स्थळ प्रत
सं: काव्य नं. 11

फळफळलें दैव दिसे
आज ह्या जनाचें ! ७

पूर्ण चंद्र उगवुनियां
चंदेरी करि दुनिया;
भिडति हे चकोर तया
कांत–लोचनांचे. ८

कांति–सुधा मजवरते
हिमगंगा अवतरते,
अनुलेपन ही करिते
मलयचंदनाचें. ९

सुधवल हे किरण कसे !
चांदीचे शरचि जसे.
झरति सखे ! यांसरसे
चंद्रमणि मनाचे. १०

जनदृष्ट्या सधन न मी.
परि तोषा काय कमी !

दृष्टिच ही मानिन मी
कवच कांचनाचें !

धमक चमक नित्य नवी
आणुनि ही मन जमवी.
संजीवन म्हणति कवी
हीच जीवनाचें. १२

मीनाक्षी ! हे महिले !
स्थान तुझें ये पहिलें.
बक्षिस हें म्हणुनि दिलें
सदभिनंदनाचें. १३

राजकवि चंद्रशेखर

११ [illegible] १९५५
नों. नं. ७५०१८

## दृढ विश्वास

न लाभ घडला असे, मम समग्र नौका जरी
शिडें पडुनि फाटुनी तुटुनी रिक्त आल्या घरीं
न संशय मला उरीं, हरि करील तें तें बरें
तयाकडुनि केधवां घडत चूक ना हें खरें ! १

दिसे वरुनि हानि जी हितचि तें करी ईश्वर
विलाप करितों जरी तरि विनाशनें जर्जर
निराश किति अंतरीं, कितिहि खिन्न झालों परी
तुझे अढळ भक्तिनें चरण सोडिना श्रीहरी ! २

न संशय मला उरीं, मम समस्त या प्रार्थना
धरीं श्रवणिं ना हरी, सफल ना करी कामना,
दयालु सकलज्ञ तो पुरवि त्या न जो संप्रतीं
नसेल मज पात्रता अजुनि जाहली त्याप्रती ! ३

मधूनिमधुनी रडें मजसि कोसळे, ना खळे
प्रदीप शुचि बुद्धिचा सतत नान्तरीं मावळे

न संशय मला उरीं, हरि करील तें तें बरें
तयाकडुनि केधवां घडत चूक ना हें खरें ! ४

घनापरि सरांसरां असुखवृष्टि होते जरी
अली मधुपुटीं जसे पडति संकटें मच्छिरीं
महोच्चपदप्राप्तिची करितसे मनीं वांछना
यश:प्रद न होय तें असुखकष्टभोगाविना ! ५

प्रकाश पडला मनीं, भयद गांठिलें संकटीं
तयें रडविलें भयें, हृदयिं कांपविलें हटीं
दिसे परमलाभ तो मज महान हानींतुनी
न संशय मला उरीं कथिति हेंचि ते सन्मुनी ! ६

नौका निकोप जशि क्षेपणिसाधनानें
दे तोंड, हाहि पवना, दृढ भावनेनें
ती भावना प्रबल होत दिनादिनान्तीं
तीचा नसे कधिंहि भंग भवीं भवान्तीं ! ७

अज्ञात दुस्तर असे जलधी मृतीचा
तो जावया तरुनियां पथ संसृतीचा

धैर्यांत होय न उणें लवलेश कांही
विश्वासपूर्ण हृदयीं, मम घोषणा ही ! ८

पां. रा. नंदुरबारकर

## बाळविधवा !

नाथांनीं परलोकमार्ग धरितां
मातेसवें राहतें;
दुःखी मी असहाय्य बालविधवा
आयुष्य हें कंठितें;
माता निद्रित, मीहि, मध्यनिशिला
माझें घरीं येउनी
नेती गुंड मला बळें फरफरा
बागेकडें ओढुनी ! १

'या हो ! धांवुनि या !! उठा झडकरी
त्या काळझोंपेंतुनी,
न्या हो गाय गरीब सोडवुनियां
या व्याघ्रपंजांतुनी !'
ऐसी ओरडलें, परंतु कुणिही
शेजार-पाजारचा

आला सोडविण्या सखा न मजला
सत्पूत हो माइचा २

साध्वी साध्विच राहिली द्रुपदजा,
श्रीकृष्ण बंधू तिचे,
तुम्हां बंधु तसे मनीं समजलें
कृष्णापरी आमुचे;
येऊनी विपदीं त्वरें भगिनिच्या
तो संकटाला हरी,
माझे ' कृष्ण ' खरेच कृष्णवदनी
होते घरा-अंतरीं ! ३

वाटे श्वान बरे अजाण पशुही
आपत्प्रसंगांतुनी
भोंकारें सगळे सजातिय कसे
येती क्षणीं धांवुनी;
जीवाचा करुनी करार झटलें
सत्वास रक्षावया,

दैवाची फुटकी म्हणून जगळें
हें शील जाऊनिया ! ४

द्रव्याचा अपहार, हाल करुनी,
आगी घरां लावुनी,
जाती गुंड असूर आर्य-ललना-
लज्जेसही घेउनी !
नाहीं संघटना, स्वकार्य-अभिमान् ,
कर्तृत्व जेथें नसे
दुष्कीर्ती, विपदा, गुलामगिरि ही
त्यांच्या ललाटीं असे ! ५

गेले पूर्वज थोर निर्मल अशी
कीर्ति-ध्वजा लावुनी,
आम्ही वंशज ! भ्याड वृत्ति अमुची
पाहून त्यांचें मनीं-

झाला तोष असेल नाहिं, बुधहो,
तुम्हां कसें वाटतें ?
लज्जेला चुडि लागली भगिनिच्या,
हा दीप ओवाळितें ! ६

सुं. गो. काळेले

# उदारा, फेडुं कसें मी ऋण ?

[ चाल—श्री. तांबे यांच्या ' फरीवाला ' कवितेप्रमाणें. ]

जाई मति गुंगुन,

उदारा, फेडुं कसें मी ऋण ? ॥

पवित्र सुंदर हृदय–मंजुषीं,
रत्नहिऱ्यांच्या खचुनी राशी,
गुप्तपणें तो ठेवा देसी
मत्द्वारीं फेकुन,

उदारा, फेडुं कसें हें ऋण ? १

दान–दान हें तुझें लाजवी,
दानपट्ट ते भूप लांछवी,
मूर्तिमंत औदार्य प्रकटवी,
मोहुनि जाई मन,

उदारा, फेडुं कसें परि ऋण ? २

दान तुझें आदरिलें, किंवा
तिरस्कारिलें अविचारें वा,
विचार तुजला तिळ न शिवावा !
त्यागमूर्ति तूं ! पण
उदारा, फेडुं कसें मी ऋण ? ३

जगत बोलतें, ' आहे निष्ठुर,
अमोल दाना झिडकारी कर,
कदर न हिजला, कृतघ्न फार ! '
सत्य नसें हें, पण
उदारा, फेडुं कसें तव ऋण ? ४

सर्व–साक्षि त्या परमेशाची,
साक्ष देवुनी सांगत साची,
मनिषा दाना स्वीकारण्याची,
परि मी निष्किंचन !
उदारा, फेडुं कसें हें ऋण ? ५

आयुष्याचे सौख्य-रंग ते !
अविरत-अश्रू-माले-सहितें
वाहुनि गेले होय मन रितें
जीव हळहळे, पण
उदारा, फेडुं कसें मी ऋण ? ६

मृतप्राय तनु शुष्क सांपळा,
त्राण त्यांत अणु नाहीं उरला
मृदुता लोपुनि होत खिळखिळा,
क्षीण होत क्षणक्षण,
उदारा, फेडुं कसें तव ऋण ? ७

उशी करूं का मम कायेसी,
शिरकमला तव, विश्रांतीसी,
उखिर वाखिरी खुपेल तुजसी,
भीति अंतरीं पण,
उदारा, फेडुं कसें तव ऋण ? ८

नाहीं, नाहीं, योग्य असें तुज,
उरलें घाया, क्षमा करी मज,
थांबुं नको क्षण, अवर, दुःख मज,
असह्य होई जिणं,
उदारा, जा झणिं येथुन पण ! ९

वनमाला

# हृद्यंगम संगम

दो सरितांचा जीवन–निर्झर एकच मार्गा धरी ।
मीलना उत्सुक हृदयांतरीं ॥
पथ भयद वाटला, धडकी भरली उरीं ।
कटु समय पातला, क्षणीं घातली उडी ।
परि जीव वांचला, ये सोन्याची घडी ।
दो सरितांचा जीवन–संगम परस्परां सांवरी ।
प्रीतिला अंकुर फुटतो उरीं ॥ १

एकदुजीच्या सहवासाची ओढ बसुनि अंतरीं ।
अंकुरा जोम मिळे सत्वरीं ॥
हो विरह, विरह नच कंटक मार्गावरी ।
ये उसळुनि जीवन दूर तयां तें करी ।
उसळतां जीवना जोम येइ झडकरी ।
परस्परांच्या सहवासाची भूक शमेना, परी ।
वाढतें प्रतिदिन जणुं माधुरी ॥ २

जलसिंचन हो, करस्पर्शनें अंकुर पल्लव धरी ।
प्रीतिची लता डुलत अंतरीं ॥
ये चंडकिरण तो राग–मिषें चिडविण्या ।
ये घनहि मधुनि तो अश्रुमिषें झुरविण्या ।
ये इंदु मधुर तो हर्ष–मिषें खुलविण्या ।
सहवासाचा पवन झुलवितो, लता बहरली पुरी ।
सुमन–मय जीवन सारें करी ॥ ३

सुमनांचा मधु गंध दरवळे, पावन जीवन–झरी ।
धन्यता पावति हृदयांतरीं ॥
जागिं सु-मन फुलविणें जीवन–हेतू धरी ।
पदिं प्रीतिलतेच्या लोळण हर्षें करी ।
नव–जीवन लाभे, मोद भरें अंतरीं ।
सुमना देती संजीवन त्या हेतु सफल अंतरीं ।
गुप्त मग होति संगमांतरीं ॥ ४

कितीक सरिता प्रेमसुमांना जपुनि ठेविती उरीं ।
अर्पिती सागर–हृदयांतरीं ॥

तो भाव आगळा, प्रेमहि तें आगळें
तें तुला कळेना मलाहि ना तें कळें
जगिं मोक्षसाधना मार्ग होति वेगळे ।
अथांग सागर, जीवननिर्झर अपुलें नाजुक परी ।
मार्ग तो नको आपणा तरी ॥ ५

उन्मादानें प्राशित सागर जीवन-रस-माधुरी ।
सारखी सरिता-अधरावरी ॥
पाहुनी धडधडे अंतर माझें, सखी ।
त्या सरिता होती खऱ्याच कां गे सुखी ।
तो चुंबन घेई, देइ सहस्रां मुखीं ।
नाजुक प्रेमा कळे न त्याला, खळखळ भारी करी ।
छेदितो कोमल नववल्लरी ॥ ६

बरें तियेचें जीवन, निर्झरि जल-सिंचन जी करी ।
शोभवी वनश्रीस सुंदरी ॥
ती स्नेहभरानें लोळण घे भूवरी ।
ती वनश्री मुदें डोलत स्वागत करी ।



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५९३८

ती सरिता दुसरी प्रेमें हृदयीं धरी ।

निर्मळ प्रेमळ सहवासीं त्या स्वर्ग गमे भूवरी ।

शोभला विमळ भाव अंतरीं ॥

संगम पाहुनि हृदयंगम हा स्वार्थ मुग्धता धरी ।

लाभली जीवनास माधुरी ॥ ७

वनमाळा

## एक प्रार्थना

आकाशींचा मळा देवें नांगरूनी ।
पेरणी करूनी राखियेला ॥
अमृताचें पाणी शिंपोनीयां रोपां ।
वाढविलें जोपासना करुनी ॥
तरु जे वाढले तेथ रोपांतोनी ।
कळया त्यां येऊनी शोभताती ॥
तारा त्याच कळया मळा शोभवीती ।
सदैव नाचती दिव्यानंदीं ॥
परी एक कळी खुलली हांसली ।
तीच नभीं झाली चंद्रफूल ॥
उत्सुक होऊनी देव वाट पाहे ।
तारकांचीं फुलें केव्हां होतीं ॥ १

*　　　*　　　*

देवा हृदयांत गुणांतें पेरूनी ।
मायेचें घालूनी नित्य पाणी ॥

तूच वाढवीलें जतन करूनी ।
रोप हें जपूनी शैशवांत ॥

रोप वाढुनीयां वैभवें आनंदें ।
कृपेच्या निस्यंदें डोलताती ॥

परी रोपांवरी कळया ज्या वाढल्या ।
येऊनी राहिल्या वृथा तेथें ॥

पुष्परूपें एक कळी ना फुलली ।
कळीच राहिली कळीरूपें ॥

मग कोठुनीयां सुवास जगाला ।
आनंद फूलला नाहीं जरी ॥

देवा सांग काय कळया हृदयींच्या ।
फुलें न व्हायाच्या काय कधीं ॥

फुलांना आपुला वास का येतसे ।
अन्य तीं मानसें डोलवीती ॥

फुलें रे नाचूं दे सदैव हृदयीं ।
वास ठायीं ठायीं पसरूं दे ॥ २

*   *   *

उद्यानींच्या कळ्या सुकोनीयां जाती ।
जीवन तें कीती त्यांचें देवा ॥
परी देवा माझ्या हृदयींच्या कळ्या ।
तश्याच राहिल्या कृपा तरी ॥
जन्मीं याच जरी कधीं न फुलल्या ।
जरी त्या राहिल्या हृदयांत ॥
जन्मांतरीं देवा फुलें त्या होतील ।
गंधें भारतील विश्व सारें ॥
बीज रे राहूं दे क्षेत्रींचें क्षेत्रींच ।
वायां न कधींच जायाचें तें ॥ ३

भालचंद्र दत्त

# प्रीतीस

उडत गोड पांखरां । येईं माझिया घरा ।
रुचिर आणिला तुला । घांस सुंदरा ॥

गायन तव अति मधूर
गंधर्वांचा सुस्वर
सुकल्या या जीवावर । तान घे जरा ॥ १

तुझ्या विना पहा उदास
त्रासलों अती जिवास
येइ जवळि देइं हात । मजसि प्रियकरा ॥ २

एकलेंचि आभाळीं
फिरशिल किति अवकाळीं
माझ्या या हृदयांतरीं । फीर पांखरां ॥ ३

तुजसाठीं सदन नवें
बांधियलें सुंदर हें
त्यांत शिरुनि मौज करुनि । देइं ढेंकरा ॥ ४

भालचंद्र दत्त

## एका मुलीस

तारुण्याच्या नवद्वारावर कोण मुली तूं सांग उभी ।
तुझ्यासारखी पहा उमटली छटा गुलाबी नील नभीं ॥
बाल्यींची जाऊनी चपलता वृत्ति लाजरी तव झाली ।
उद्यानींही पहा रवीला लाजुनि लवल्या फुलवेली ॥
बाल्य सहज टाकुनी परकरा नेसलीस साडी हिरवी ।
शरदागमनीं पहा धरेला हिरवा शालू हा नटवा ॥
खुललें बाले वदन तुझें हें आधीं हांतिस कुंदकळी ।
तवानुकारी पहा प्रभातीं फुलें मनोहर हीं फुललीं ॥
उदार हृदयांतरीं तुझ्या या विचार सुंदर गुणगुणती ।
प्रफुल्ल कमलावरी ज्यापरी भ्रमर गुंगुनी मधुगीती ॥
क्षितिजावरि लावुनी नेत्र हे काय पाहसी सदा अशी ।
भविष्यांतलीं सुखचित्रें का उभीं राहतीं तुजसरसीं ॥
हळू हळू टाकीत पावलें जाशिल नवतीच्या प्रांतीं ।
परी हीच राहील निरंतर माझ्या अंतरिं तव मूर्ती ॥
विमल चित्त तव गुलाब फुलुनी वास तयाचा दरवळला ।

कुवासना आमोदबलानें दूर पळाल्या थरथरल्या ॥
उषा लाजरी मुली ज्यापरी नित्य हांसते देवघरीं ।
वडिलांची आपुल्या उषा तूं हांस हांस गे तदंतरीं

भालचंद्र दत्त

( चाल-' काय गाउं मी मज कुठली० ' )

मंजुगान घुमतें कानीं; धुंद विश्व डोलें
गात रहा ह्मणुनी सखये चित्त गुंग झालें ॥ धृ० ॥
शांत पवनवीची येई गान ऐकण्या ती
गानिं गुंग कलिका डुलती ताल जणूं देती
मोदभरें नवपल्लव गे पवनिं डोलताती
गानवारुणीनें जणुं हें धुंद विश्व झालें ॥ १

निशानाथ गगनीं रंगे, रंगवी जगातें
शांत तिमिरपटलें होतां, शांतवी वनातें
कृष्ण निशा सोज्ज्वल भासे, तोषवी जनातें
पवनगीत-पियुष पिउनी मुदित ते जहाले ॥ २

उषागानरसपानानें धुंद अंशुमाली
अरुणरागकांती पसरी ह्मणुनि अंतराळीं

योग्यसमयिं दिनक्रम सरतां यत अस्तकालीं
सांजगीत श्रवणीं पडतां चंद्रभानु डोले ॥ ३

हृदयशारदेची वीणा मृदुल करें छेडीं
मंजुस्वरें गाउनि जगतीं आण म्हणुनि गोडी
शुष्क मजसि जीवन वाटे, संसृतिची बेडी
शीण देइ मजला म्हणुनि चित्त व्यग्र झालें ॥ ४

तरलगान सरिता गाउनि रंजवी प्रियातें
अब्धिहृदय प्रणयावेगें कांपतें तदा तें
एक उसळि मारुनि तिजला आत्मरंगिं ने तें
भिन्न वर्ण नादब्रह्मीं विलिन तैं जहालें ॥ ५

रा. म्हा. वाघमारे

( स्रग्विणी )

त्वन्मुखेंद्वीक्षणाची धरूनी चितीं
आस, गेलों कितीदां, न त्यातें मिती
भीरु ! दारावरूनी तुझ्या त्या दिनीं,
'हेतु साफल्य पावो,' मनीं हें म्हणीं १

दर्श होता परी भामिनी ! त्या दिशीं,
लुप्त होता जहाला नभींचा शशी,
आणि बैसे दडोनी गृहाभीतरीं
त्वन्मुखेंदूहि तेव्हां तयाच्यापरी ! २

* * *

जात दारावरूनी तुझ्या मी असें,
गोड कर्णां, तुझे शद्ब, आले असे
उत्तमे ! माझिया तोंच कानांवरी,
त्यांत होती अहा गीतिची माधुरी ! ३

थांबलों मी जरासाच ऐकावया,
हा ! हळूं लागले तोंच लोपावया
गे ! तुझे शद्व सायंप्रकाशापरी,
खेद आघात चित्तावरी तैं करी ! ४

* * *

येत होतों समोरूनि मी कामिनी !
गेहवातायनांतूनि लोलेक्षणी
चालले केवि होतें तुझें पाहणें
नेत्रकक्षेंत यावें तुझ्या या जनें ! ५

केवि बोलावितां लाजले लोचन
प्रेम ओष्ठांवरी बैसलें येऊन !
कंकणांनीं तुझ्या हृद्गत सांगिजे
मद्-हृदाला मुदानें तदा व्यापिजे ! ६

* * *

वृक्षपर्णांस लावील लाजावया
पातळातें अशा चारु लेऊनियां,

मराठी ग्रंथ संग्र
स्थळ प्रत
सं. ....... नं. .......
ता. .......
ठाणे.

जात होतीस दारावरूनी मम
चारुगात्री ! क्षणीं वायुवीचीसम

वास पायांत आलें मिषें या तधीं
थांबलीस प्रिये ! तूं जराशी मधीं;
वाटली माझिया गोड चित्ता किती
प्रीतिची गे तुझ्या ती मिषापह्नुति ! ८

नूपुरांची पदांतील जी झंकृती
थांबुनी तूंचि केलीस, दे सौख्य ती;
मत्-श्रुतींभोंवतीं गुंजला तो ध्वनी,
काल होई जरी गे तुला जाउनी ! ९

*　　　*　　　*

येत होतों कसे तन्वि ! दोघेजण
भिन्न ऐशा दिशांनीं पथें आपण !
ईक्षितों मी तुला, हें तुवां पाहतां,
तूं जहालीस जाती कशी सस्मिता ! १०

*　　　*　　　*

मूर्ति दारीं तुझी जैं गृहाच्या उभी,
कीं कडेच्या वरी चंद्रम्याची नभीं,
जात होतों तदा तेथुनी सुंदरी !
रक्तिमा तैं मुखश्री त्वदीया धरी ११

पाहिलें जाउनी मी जरासें पुढें
जों वळूनी तुझ्या रम्य मूर्तीकडे,
देखिलीं तों तुझीं पाहतां चोरुनी
लोचनें कांत दाराचिया आडुनी ! १२

* * *

नेहमीं दावुनी रागचिह्नें अशीं
राजसे ! कां पिसें या जना लाविशी ?
रुक्ष, संतप्त गे ! कच्छचें ईरिण
हें तुझ्यावांचुनी वाटतें जीवन ! १३

* * *

चंद्र होता नभीं शांत होती निशा,
पुष्पगंधें कशा व्याप्त होत्या दिशा !

पाहतां इंदुला, आग हो भोंवतीं,
चित्तचक्षूपुढें ये तुझी आकृति ! १४

* * *

भूमि देहास या ओढिते केवल,
थोर आहे तिच्याहूनि तुझें बल;
ओढिसी गे ! मना तेविं देहास तूं,
ओढ तुझी कळे, ती महीची नतु १५

* * *

प्रेम जेथें असे, काल तेथें किती ?
बोल, होईल ना आपुली गे ! युती ?
बाहुमाला गळां प्रीतिनें घालुनी,
सांग, होशील केव्हां मदीया जनीं ? १६

ना. बा. पुराणिक

## मानलेल्या बहिणीस

थोरा घरचे मुली
होइ तूं गरिबाची साउली ॥ ध्रु० ॥
मनिंचा हेतू सफल जाहला
मनाजोगता पती मिळविला
तोहि तुजमुळें धन्य जाहला
संसारीं भूतलीं १

सुयोग ऐसा क्वचितच जुळतो
बघुनि ह्मणुनि मम जीव हुरळतो
आनन्दें आशीष उधळितो
बन्धुभाव ओञ्जळीं २

फुलूं नको पण गर्वभरानें
जबाबदारी जाणुन घेणें
भावाचें ह्या गरिब मागणें
कळकळ ही आंतली ३

परमेशाची थोर कृपा ही
उणिव तुझ्या सौख्या नच कांहीं
विसरणार पण देशा नाहीं
घेइ प्रतिज्ञा भली ४

गरिब लेंकरें दारीं येतीं
शिक्षण त्यांना कुणीं न देतीं
केविलवाणी वणवण फिरतीं
अनवाणी पाउलीं ५

विद्येच्छूं बालकें बिचारीं
कशी बशी मागून मधुकरी
काळ कंठती उपासमारी
मुठभर दे माउली ६

दारिद्र्याच्या घरीं जन्मले
ध्येय उरीं जप जपुनी थकले
उच्च शिक्षणा जे अन्तरले
आशा मन्दावली ७

अपमानाचे जाळ पेटले
आकांक्षेचे अंकुर जळले
हताशुनी अन्तर हळहळलें
झळ नाहीं शान्तली ८

जरी आसरा त्यांना मिळता
आशातरु मग फुलला असता
आली असती विश्वबंधता
अशक्य नव्हतें मुळीं ९

हाय काय पण आतां वदणें
मागें चुकलेलें सावरणें
देशाला जें लाजिरवाणें
लाज समज आपुली १०

अनाथ बाळें भावि काळचीं
हिरे–माणकें जीं देशाचीं
बघवेना दुर्दशा तयांची
दूर कुणी लोटली ११

सोड दुजेपण त्यांच्याविषयीं
सत्वर त्यांना पदरीं घेई
ह्याच यशाचें लेणें लेई
अमोल भूमंडळीं १२

बहीणभावांचीं हीं नातीं
मानुं नको तूं अपुल्यापुरतीं
देशबांधवास्तव श्रीमंती
वेंच आपुली खुली १३

गाङ्गेय

## शेत्याची शीळ

हे सोनवडी-वावर
पिकाया सर जी.
करि गोड नाद खळखळ
बांध-ओव्हळ जी.
चिरतात मासळ्या खळ
त्यांत सळसळ जी.
या निजामशाहीभर
झाडि किर्किर जी.
तरु मोहाचे भलभले
गाळती फुले जी.
हंगामीं रात्रंदिन
इथ राबण जी.
आगटी, झोपडीपुढे
जळति लाकडें जी.

वाघऱ्या करी गुर्गुर
पायथ्यावर जी.
भिलवडा लांब बाजुला
करी गलबला जी.
कोहीड पहाडी–गळा
काढि मोकळा जी.
गाजतो अक्षि हंबर
न काही डर जी.
टेकडी, देऊळ वर
पगा सुंदर जी.
कळसास झाडतो निळ्या
निंब–डाहळ्या जी.
अम्बाई किरपा करी
अवंदां खरी जी.
हा हिरवा शालू दिला
तिनं कोवळा जी.
ही टंच बाजरी तशी

जशा कानसी जी.

हीं तुरींत भरूनी दिली

लाल पोवळीं जी.

ती कणसं मक्की धरी

कडेखांदरीं जी.

तळपतो तियेचा तुरा

उडे भुरभुरा जी.

येइना अजुन मालण

तळमळे मन जी.

भय रागाचं लइ तिला

पहाता मला जी.

चळचळा ल्हाळीं जळीं

कांपते मुळी जी.

मग कशास रागें भरूं

अबोला धरूं जी.

कानाला चाहुल कळे

पीक सळसळे जी.

टोपलींत लोटा, वर
दिसे भाकर जी.
पिरतीची मोहनकळी
जवळ पातली जी.

सुरेश

## खेड्यांतली हिरकणी

घेऊन् कळशी कटीं
निघाली पाण्याला एकटी ॥ ध्रु० ॥

प्रथम मुळाची नविन नोवरी
बघत भूषणां पदर सांवरी
जणुं पडद्यांतुनि ये बाहेरीं
नाट्यगृहांतिल नटी १

खुले मुखावरि छटां हांसरी
मुरडत मानहि घोळ आंवरी
ठुमकत ठुमकत ये गंगेतिरीं
खोवून् वरती वटी २

पाणथळ्याशीं येउनि पाहे
जल गंगेचें गढूळ वाहे
'मना तिकडच्या रुचेल कां हें ?'
उभी संशयें तटीं ३

दिसतां वाळू उघडी पडली

प्रत
ता.

तींत झरा ती फ़ारेती झाली
शुद्ध जलातें शोधी खालीं
पुन्हां पुन्हां थापटी
नितळ जलाचे फुटुनी पाझर
भरूं लागतां झरा झरझर
कलती कळशी धरली त्यावर
भरायास शेवटीं

* * *

नव्हतें माहित उगमावरतीं
झाली त्या दिशिं बहु जलवृष्टी
महापुराची जीभ उसळती
येऊन् तिज घे परीं !

सुरेश

# एक आस

आशा गोड मनांत, गाढ तुजला
देवोनि आलिंगन
व्हावें प्रेमभरें विलीन तुझिया
हृन्मंदिरीं भेदुन—
दिक्कालादि अनंत ऐहिक अशीं
द्वंद्वें, जयांच्यामुळें
होतीं छिन्नविछिन्न प्रेमिहृदयें
गाळूनिया आंसवें ! १

ठेवोनी हृदयांत खोल तुजला
रात्रंदिनीं राजसा
नाहीं कां ' अनुराग ' तेथिल तुवां
सेवीयला गोडसा ?
नाहीं निर्मल प्रेमसंगित तिथें
ऐकीयलें कां तुवां
सांगे हा मग ' राग ' कां अनुदिनीं

चित्तीं धरावा उगा ? २

होई व्याकुल जीव हाय ! क्षणहीं
भासे युगाच्या सम,
स्नायू हे तुटती तटातट पहा
ते अंतरींचे मम !
अश्रू, बांध फुटून मद्‌हृदयिंचा,
बाहेर येवोनिया
प्रेमें ओढिति मौक्तिकस्रज जणूं
त्वन्मूर्ति ध्याऊनिया ! ३

गेली कां विसरून, सांग मजला
मत्प्रेम तूं सत्वर;
नाहीं सह्य वियोग होत तव हा,
मी भेटण्या आतुर ! ४

भा. सि. डोंगरे

# विनयवती प्रियेस

चल सखे लाजसी अशी कशाला ! उशिर किती जाहला
॥ ध्रु० ॥

हा चंद्र बघे हांसतो
मधु सुधा सखे वर्षितो
रोहिणीसवें सुचवितो सखे तुज मजसंगें यायला १

हा वाराही तुजप्रती
सांगे कीं, ' सोडी भिती
जा सखे तयासह सुखें जयाला जीव तुवां अर्पिला ' २

चांदण्या हंसुनि गोडशा
सांगती बघे कायशा
मज गमे अनुमती असे तयांची मजसंगें जायला ३

या सलील लहरी किती
उसळुनी तुला बाहिती
मम मनोवृत्ति दाविती सखे कीं अधीर जिव जाहला ४

जललहरी वर डोलते
ही नौका अन् बोलते
‘ झडकरी बसे सुंदरी जाऊं चल दूरी विहरायला ’ ५

कां सये कांपते तनू
मालती वल्लरी जणूं
कां घर्मबिंदु चमकती ग भालीं काय होतसें तुला ? ६

हे नयन बावरे किती
जाहले, कशाची भिती
कां उगा भिरिभिरी सये पाहसी चोंहिकडे प्रेमला ? ७

साजणी बघे आणिली
ही नौका तव कारणीं
चल बसूं तियेमधिं जगा विस्मरूं जीव जया त्रासला ८
जरि देह दोन गे सये
तरि जीव एक निश्चयें
अविभक्त असे आमुचा जिवात्मा कोण दुभंगी तया ? ९

हे प्रपंच झिडकारूनी
बंधनें सये तोडुनी
चल जाऊं जेथें सदा वसे ती दिव्यताच मंगला ! १०

कु. मालती रणदिवे

## तान्हुलीस पाहून

बघुनि ही सान रम्य बाला
        भावलहरि उसळिती हृदयिंचा दर्या खळबळला !
मुखेंदू प्रफुल्ल पुनवेचा
        शांतवि परि त्या पूर लोटला आतां भरतीचा !
बळतसे मजसमीप दृष्टी
        इवल्याशा नजरेंतहि भरल्या कितीक गुजगोष्टी !
क्षणीं हुंकार सुरू होती
        वेदार्थाहुनि आकळण्याला गूढ भासताती !
करुनिया सहकार करांशीं
        धिक्कारिति चरणहि जगतिच्या जेवि कीं मिराशी !
भिवया वक्राकृति करुनी
        कृत्रिमतेचा निषेध करिते जणुं ही फिरफिरुनी !
नासिका–पुट हीं फुरफुरतीं
        तदां गमे मज बालरूप हें जणुं घेई स्फूर्ती !
खळी ही गोड किती बाई

मराठी ग्रंथ संग्रहालय
५१
क्र. क्र. ५९३८

बघुनी हिजला गुलाब-पाकळि लाजुनिया जाई !
ओळख पटली चित्ताला
प्रत्यय त्याचा मधुर हास्य हें पटवितसें मजला !
क्षणांमधिं वृत्ती गंभिर ही
कशास ?-कळलें ! खरेंच चुकलें अगदींच मी बाई !
विसरलें तुजसि बोलण्याला
'हो-हो' करुनी तव गानाला साथहि देण्याला !
छे-गडे ! वळवुं नको मान
कशास करिशीं गडि फूं मजशीं ? हरपलेंच भान !
खुलविण्या तव चित्कलिकाही
भान नुरें मज, मन्मति भरली काव्यकल्पनांहीं !
म्हणुनि कां रुष्ट होसि बाले ?
ही बघ गाण्या तुजला गाणें तुझेंच मी सजलें !

सौ. अपर्णा देशपाण्डे

## कन्दुका !

उन्च उन्च घे उसळि कन्दुका ! मन्द कसा बारे ? ॥धृ०॥

असह्य वरचा दाब हा जरी
साहवेन तुज मृदु तूं रबरी
इवलासा जरि जगदभ्यंतरिं
जा वरि, सांवरि योग्य अवसरीं, वेगें अनिवारें ! १

पुरें अतां हीं उगाच टपटप
इकडुनि तिकडे जाशी गुपचुप
मधेंच धरितिल खट्याळ कुणि तुज
भिरकावुनिही देतिल, परि ही गति योग्य नसे रे ! २

सोडि मम करां धीरवीरसा
अधोगती ही नव्हे राजसा
भिणार कां मग व्यर्थ तूं असा ?
क्रियेमागुतीं वसे प्रतिक्रिया तत्त्व असें न्यारें ! ३

सौ. अपर्णा देशपाण्डे

# युवक

[ भूपतिवैभव ]

उत्साह उसळतो नसानसांतुनि, आणी–
तो 'अशक्य' शद्वहि मनीं कधीं नच आणी.
बिहरता विहंगम, हरिणशिशूची वृत्ती
या नांव देति जन तारुण्याची मूर्ती.
जगतींचीं दुःखें शिवतिं न याच्या चित्ता
एकली हौस, अन् ठावूक नसे चिंता.
भासतें ध्येय तें पल्याड दो हाताच्या
ती अशक्यता, संदेह तेथ मग केचा ?
वाटतें गगन तें जणूं ठेंगणें भारी
क्षणभरांत घेऊं सहज तयांत भरारी.
तो विचार गुंडाळितो आपुला गाशा
परि ठाणें देवुनि बैसे अंतरिं आशा.
वा युवका ! तुजविण कुणाकडे जग पाही ?
तुजकडेच नेत्रां लावुनि बसली आई !

सौ. अपर्णा देशपाण्डे

[ मुद्रिका ]

मज पाश मुळींही नको विजनता बरी
ही सृष्टी–नच–गृह माझें, राहीन सुखानें तरी ॥ धृ० ॥
मम मानस घरिं कोंडतें
निर्जीव सदा राहतें
इथं खुल्या दिलें नाचतें निसर्गांतरीं १
ही अफाट धरणी अती
बहु डोळे श्यामल छतीं
माथिं वस्तु अद्भुत—मती स्तिमित बावरी २

सौंदर्यचित्र देखतां
पर्वा न गृहाची अतां
हांसतें हृदय, नकळतां सौख्यता धरी ३

द्रुम अशोक भव्याकृती

वर वेली वक्रागती
तरु तात, हरित मधुलता माउलीपरी ४

मृदु शाद्वल भूमी दिसे
चित्तांत मोद द्रुत वसे;
कृत्रीम बिछाना–नसे लोभ त्यावरी ५

झोपेन शांत होउनी
मग शीतल वाऱ्यांतुनी
गातील विहग हर्षुनी उंच अंबरीं ६

मृगशावक हे धांवती
प्रीतीनें मशिं खेळती
मज तुच्छ मर्त्य–संगतीं नसे माधुरी ७

किति भरें वृक्ष वांकले
देतील मधुरशीं फळें
चालेल जरी ना मिळे करंजी–पुरी ८

निर्झरिणी–जल वाहतें
वन–पक्षी–कुल नाहतें
डुंबण्या चित्त धांवतें तरंगांवरीं ९

या प्रिय कांतासंगतीं
तारका सख्या चमकती
स्वर्गीय दिव्यांच्या तती डुलत पुष्करीं १०

परमेश्वर दिसतो मला
साकार इथें प्रकटला
मृगजला मनुज भाळला व्यर्थ पैकीं परी ११

शेखर

# मुसल्मान नटीस

[ सुमंदारमाला ]

निळ्या नीरदाआडुनी चांदरातीं
    निघे नाचणारी नभीं चांदणी,
बिलोरी कमा निर्मिली लाजवाया
    तुझी, झांकळूनी पडे मानिनी !
अहा ! रंगभूमीवरी ढंग नाना,
    छटा सेंद्रचापापरी आननीं,
विभूषा मनोहारिणी चित्ररंगीं,
    —जणूं सृष्टिची भिन्नता कोंदणीं !   १

कधीं पाचुचा गर्द पोशाख साधा,
    कधीं अंबरींचा निळा, जांभळा,
कधीं अंजिरी, केशरी, शुक्ल, काळा,
    खुले तांबडा गुल्शनी आगळा,

झिलाई तनूची मला रोषनाई
रुपेरी गळ्याची मृदू बांसरी,
हळूं मखमुली पाउलीं नादताती
कटीबंधिच्या किंकिणी भूवरीं ! १

समुद्रावरी मेंड मौआल किंवा
डुले संथ फेसाळतां नावडी,
फुलिंगापरी सर्पिणीची विषारी
नसे भूमिका अल्पही बावडी;
जधीं रोखितो गोकुळींचा कनैय्या
बनावें तुवां राधिका हांसरी,
उरस्पंदनें अंग हेलावतांना
कपोलावरी खेळते झल्लरी ! २

मुखीं खेळवीतां लता मोतियांची
मधें रोखुनी लाडकें पाहणें
फुलोडी गमे मस्करी सिक्तबिंबा–
धरीं बाहुटें चुंबनीं लावणें;

तुला बोलती लोक रोशन्कुमारी
कलावंतिणीची कुणी पोरटी,
खुळ्या रूढ जाती कुळाच्या दिमाखें
गुणांना कुठें लागते ओहटी ? ४

पहाडी गडे ऐट, नेत्रीं घिटाई
—गमे पूर्वजांची प्रभा सांठली
स्मरावी महंमूद, अक्बर, शिकंदर्,
शहाजान, ऐशी बिरूदावळी;
तुझे जातभाई अह्मां हाडवैरी
'गनीमां' चिराया न केलें कमी
कटाक्षें सगेसोयरे तेच झाले
निवाली शरीरांतली रुस्तुमी ! ५

किती दाबितो अंतरींचा उमाळा
परी पाझरे प्रीतिची माधुरी,
कशीही जनीं ऐस तूं मस्त पोरी
किशोरी ! दिसे शुद्धता मूखरीं;
बनावें मुसल्मान जाती झुगारी

कराची नमाजी तुझी ना दुजी,
झुरा पाजावी प्रीतिची–धुंद झालों !
इराणी दुराणी असे इर्मुजी ! ६

शेखर

# देव नसलेलें देऊळ

घोर रात आवसेची । भंवतालीं किर्र झाडी
एक रातकिड्याची ती । चाले किरकीर
गरीबाची पर्णकुटी । हळु हळु जळे पंती
शेवटली प्राणज्योती । जणुं ती राहीली
स्वैर वारा तो वाहात । वृक्षलता हालतात
घोरतमीं नाचतात । भूतें भोंवतालीं
सानुल्या त्या झोंपडींत । मृत्यु घिरट्या घालीत
माउलीचा बळी घेण्यां । दीन बालकांच्या
"ताई, आतां काय करूं ? । कोणाला मी हांक मारूं ?
आईच्या जीवाचें तारूं । फुटणार काय ?
अभद्र हें भाऊराया । बोलूं नये; देवराया
दीनबंधु संकटीं या । धावूनि येईल
जाऊनि तूं देवालयीं । चित्त ठेवी देवापायीं
" देवा सुखी ठेवी आई " । विनती करावी
कठीण तो येता काळ । नसे कुणीही जवळ

करी आपुला सांभाळ । एक देवराय

जोडूनी देवास हात । बाळ प्रेमें विनवीत
अश्रुबिंदु नेत्रीं येत । ओघळले गालीं

" दीनांचा तूं वाली देवा । करीतसे तुझा धांवा
देई हांक मनोभावा । अंत ना पाहावा

देव भावाचा भुकेला । लोक सांगती आम्हांला
देवा आमुच्या हांकेला । धांव झडकरी

माझें देऊनी आयुष्य । करी चिरायू मातेस
परी नेऊं नको तीस । आम्हापासूनी–"

पडसाद देवळांत । ध्वनि तोच पुन्हां येत
दुःखें जड झालें चित्त । परतोनी जाय

मावळली प्राणज्योती । निमाली ती क्षीण पंती
अंधारीं त्या सर्व सृष्टी । भयाण भासली

दिसे जरी ती भयाण । करी अंतरीं रुदन
श्वास, विषण्ण होऊन । सोडीत एकली

नीर नयनासीं येत । सृष्टि सारी चिंब होत
दंवबिंदू ओघळतें । कुणी न ते पाही

* * *

" ताई असें काय होय । सौंदर्य नसें कां देवांत ?
जसे कां ग देवळांत । देवराय, सांग ?

यशवन्तानुज

## येशील ?

अकस्मात् येउन मम जीवनीं
जन्मांतरिच्या खुणा सांगुनी
पटविलेंस मज, मी तव भगिनी
पाठीराखा बन्धु होऊनी सदैव रहाशिल का ? १

नसें जगाचा अनुभव अजुनी
सदा हंसावें जाणतें मनीं
घडतां परि अपराध चुकूनी
सदा, उदारा, सांवरूनिया मजला घेशिल का ? २

पापानें भरलेल्या जगतीं
तव आत्माची ज्योत जागती
अखंड मंगल माझ्याभंवतीं
मज रक्षाया दुरितापासुनि धाडुनि देशिल का ? ३

भाग्यसूर्य मम नभीं तळपतां
यशोगान जग सगळें गातां

स्तुति-वर्षावें मी बावरतां
हा कर धरुनी, मज धीरानें, सत्पथिं नेशिल का ? ४

फुललेल्या नव कुसुमोद्यानीं
कान्तसंनिधीं संचरते मी
मम आनन्दें हांसे रजनी
कौतुकमंगल दृष्टिक्षेपा दुरुनी करशिल का ? ५

सुखोद्यानिं वासन्तीं विहरे
चन्द्र हासतो, धुन्द मदभरें
नशा यशाची लोचनीं स्फुरे
अवगणतां मी सकल जगाला क्षमा न करशिल का? ६

सुखाच्या क्षणीं तुला न स्मरलें
व्यथा हृदींची तुझ्या विसरलें
तुझ्यापासुनी दूर जहाले
संकट येतां, विसरुनी सारें, धांवत येशिल का ? ७

आशासुमनें सुकुनी जातां
जग उपहासें हांसत असतां

खिन्न दूर एकलींच बसतां
अश्रु ढाळण्या, मदीय शीर्षी धाउनि येशिल का ? ८

इन्दुसखी

काव्य ११५८

## अभागी बहीण

आलि आज भाऊबीज । कोसळूं दे परी वीज
कशी साहूं नाहीं भाऊ । राही कामकाज ॥
कसा तरी टाकी सडा । काढियल्या रांगोळ्या या
नाहीं परी भाऊराया । कौतुकें पहाया ॥
हंसला कीं भाऊराया । गतवर्षी पाहोनीया
कासव मीं काढिलेलें । चोवीस थेंबाचें ॥
परी आतां काढूं जातां । काय बाई होत हातां
नाहीं भाऊ पाठीवरी । फिरविण्या हात ॥
जरी गेले आईबाबा । तुला मला ठेवोनीया
भेट त्यांची होत मज । तुजसी पहातां ॥
परी आतां पाहूं कुणां । शांतविण्या माझ्या मना
भाई गेला ना शेवटीं । राहिलें एकटी ॥
रुसला कां माझ्यावरी । म्हणोनिया गेला वरी
आईकडे रागावोनी । सांगाया गाऱ्हाणीं ॥
घड घड वाजे गाडी । वाटे मज आला भाई

गाडी परी पुढें जाई । थांबेना ती दारीं ॥
ह्मणे भाऊ वेडी मज । राहिलें मी वेडी साच
कीं झालें मी वेडी आज । कळेना मजसी ॥
येई कसा माझ्या घरीं । थांबला जो देवादारीं
पाहोनीया स्वर्गसुखा । विसरला मला ॥
स्फुरतात हात तुला । लावण्या उटणोतेलें
परी करूं काय आतां । दैवें रडवीलें ॥
कुणासाठीं मांडूं पाट ?। कुणासाठीं करूं थाट ?
कुणासाठीं वाढूं ताट ?। काय माझी वाट ?
म्हणे बाळ ‘ मामा केव्हां । आणणार नवी टोपी ?’
‘ माभा तुझा देवाघरीं । गेला असे झोपीं ॥’
मोठ्या कष्टें सांगे बाळा । येई पाणी माझ्या डोळां
त्यानें स्नान घाली तुला । अभागी बहीण ! ॥
लावोनीया जरी ज्योति । भगिनी या ओवाळीती
विझतां ही प्राणज्योति । ओवाळिन तुला ॥
असो मग अमावस्या । किंवा काळरात घोर
नसेना कां चंद्रकोर । करूं भाऊबीज ! ॥

सारङ्ग

## जलबिंदूंचें गाणें

हळुं हळुं या, झिम झिम या । सकलांना
झणिं चकवूं या ॥ धृ० ॥

सृष्टीचा हिरवा शालू
भिजवुनिया गम्मत पाहूं
देउनि जलमौक्तिकमाला । राग तिचा मग घालवुं या ॥

फुलें सृष्टिचीं हीं छकुलीं
मजेंत डुलतीं पहा कशिं तीं
भिजवुनि आधीं चकवूं या । मणी देउनी हंसवूं या ॥

डुलविति माना हीं पानें
वायुगायनां डौलानें
वरुनि चला, गुपचुप या या । माना खालीं वांकवुं या ॥

चिंवचिंव करि ही चिउताई
ऐट पहा तरि किति बाई
घरट्यांत तिला पळवूं या । दिमाख सारा जिरवूं या ॥

चकचकाट करुं चोंहिकडे

खळबळ उडवूं सगळिकडे

चला तरी मग झिम झिम या । वेळ मुळिंच ना गमवूं या ॥

लटक्या रागें म्हणतील

' पाउस हा चावट फार ! '

पाय हळुंच मग उचलूं या । नभांत चट्कन् परतूं या ॥

पु. आ. चित्रे

# जग आणि तूं

आनंदाच्या भरांत माझ्यासंगें जग हें नाचूं दे
–धरुनि उराशीं आसूं पुसाया हात तुझा धांवेल गडे !
पराक्रमाचीं गोड फळें या जगास माझ्या चाखूं दे
–अपयश येतां धीर द्यावया अधीर होशिल तूंच गडे !
विजयश्रींच्या गळ्यांत माझ्या जगास माळा घालूं दे
–हताश असतां हात गळ्यामधिं तुझाच ना राहील गडे !
माझ्या अंगीं असलेले गुण जगास डोईं घेऊं दे
–प्रीत परी दोषांस्तव माझ्या करशिल मजवरि तूंच गडे !
प्रकाश रविचा असेल जेव्हां देइल सोबत जग सगळे
–तिमिरपटल पसरतां, भोंवतीं वलय तुझेंच पडेल गडे !

याच कारणीं, जगास सत्ता देहावरि या गाजवुं दे
–तुझेंच केवळ सदा हृदय हें असेंच सखये राहूं दे !

पु. आ. चित्रे

## इच्छा

चित्रकारांनीं भिंति भूषवाव्या
शिल्पकारांनीं मूर्ति कीं कराव्या;
मुक्तकंठें स्तुति व्हावि कीं सभांनीं
झांकुनी शव जावेंच शतसुमांनीं ! १

नको यांतिल कांहींच सपस्कार
नाहिं त्यांची या मना ओढ फार
कुठें देवा दे गळूं अश्रु एक
'हृदय होतें या !'–पुरें एवढेंच ! २

पु. आ. चित्रे.

# तारुण्य

[ वृत्तः—पण्डव ]

सांग ना मज मञ्जुळे ग कां न तूं मशिं बोलसी
देखतां मज, दृष्टि बाले भूवरीं कां लावसी ?
हेलकावे घेत बघ हा भावसिंधू अंतरीं
वाहते ही अश्रुधारा आवरूं कैसी तरी ?
भेट नाहीं, दृष्ट नाहीं, लोटले किति हे दिन
भेट झाली आज परि कां बावरें ऐसें मन ?
सातताळी खेळतां तूं कर दिला माझ्या करीं
स्पर्श होतां कां चुकीनें होसि आतां बावरी ?
'बहिण मी, तूं भाउ माझा' ह्या अशा शपथाआणा
घेतल्या ना ?—आज परि त्यां विस्मृती यावीच ना ?
दोष नाहीं हा तुझा, ना दोष माझा हा असे
स्नेहिं हेवा वाटुनी आलें मधें तारुण्य हें !

कुमार वसंत

# रानांतील उशीर

बघ दीस बुडाला चल  सखे ग चल घराकड चल ॥धृ०॥

तांबडहि अतां जाईल
काळोख भिन्न होईल
वाटही न मग गवसेल
अन् चांदरातही नाही  सखे ग चल घराकड चल
बघ दीस बुडाला चल  सखे ग चल घराकड चल १

दोडा हा कितितरी झाला
होईल त्रास न्यायाला
पाहतील वाट घराला
अन् वेळ किती होईल  सखे ग चल घराकड चल
बघ दीस बुडाला चल  सखे ग चल घराकड चल २

गेल्याति कवाचि ढोर
रस्त्यान जाता फार
काळोख होइल घोर

अन् चावट कुनी भेटेल  सखे ग चल घराकड चल
बघ दीस बुडाला चल  सखे ग चल घराकड चल  ३

वाडग अगदीं ओसाड
झोपड जुन पलिकड
बघ कोनिच नाइ इकड
अन् भुताटकिही जागल  सखेग चल घराकड चल
बघ दीस बुडाला चल  सखे ग चल घराकड चल ४

आले ते असतिल थकुनी
शेतिच काम उरकुनी
सैपाक व्हायचा अजुनी
अन् कधी सार आटपेल  सखे ग चल घराकड चल ५

रा. के. रणदिवे

## करभार

शारदामन्दीरीं मज्जाव कुणाला
प्रवेश कुणाला ऐसें नाहीं
सागरीं नद्यांना सारखाचि मान
असो मग सान किंवा महा
माय घेत पोटीं आपुल्या पिलांना
बऱ्यावाइटांना, भेद नाहीं
म्हणोनी आणीला 'करभार' देवी
चरणीं मी ठेवी विश्वासानें
असो त्या सुगंध, असो कीं निर्गन्ध
ना मी करी खंत मुळीं त्याची
असो त्यास रंग, असो कीं बेरंग
कां मी व्हावें दंग रंगीं त्याच्या ?
निर्गन्धी-बेरंगी जन अव्हेरील
माय ना करील ऐसें कांहीं
ठेवुनीया याच विश्वासासि पोटीं



मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 59.3८
ठाणे

होऊनिया खोटी आलो येथें
म्हणूनी अर्पाया ' करभार ' तुला
सह आणिलेला अर्पितो मी.

प. मा. टोळे

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स. ........ क्र. ........
ता. ........
ठाणे.

REFBK-0005138
REFBK-0005138

# टीपा

**प्रतिभे !**—'काव्याच्या शाळा स्थापन झाल्यास काव्य वाङ्मय वृद्धिंगत होईल काय ?'–अशा एका नियतकालिकाच्या संपादकांनीं विचारलेल्या प्रश्नास उत्तर म्हणून ही कविता लिहिली आहे. **चंद्रशेखर**

**गृहिणीचे डोळे**—कोणी एक रसिक विद्वद्वर्य आपल्या गृहिणीसमागमें एकांतांत बसले असतां, गृहिणीच्या डोळ्यांशीं त्यांच्या दृष्टीची एकतानता झाली. तेव्हां त्यांच्या सौंदर्यानें खुष होऊन लाडिकपणानें ते लाडकीस म्हणत आहेत. **चंद्रशेखर**

**बालविधवा**—मे १९३२ च्या शेवटल्या आठवड्यांत बंगालमध्यें जसोर गांवीं सरोज नांवाच्या एका बालविधवेस अत्याचारी लोकांनीं शीलभ्रष्ट केल्याचें वृत्त वाचण्यांत आलें. त्यावरून ही कविता लिहिली आहे. **सुं. गो. काळेले**

**मुसलमान नटीस**—एका नाटकामध्यें काम करित असलेल्या मुसल्मान किशोरीच्या असव्याज रूपाची व फुलपांखरी अभिनयाची भूल भावनाप्रधान रसिकाला झुगारून देणें सुतराम् शक्य नाहीं. **शेखर**

**जलबिंदूंचें गाणें**—घरांत लहान खोडकर भाऊ असलेल्या 'ताई'नाच या कवितेचें खरें मर्म कळेल.

पु. आ. चित्रे